RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal | ISSN : 2348-7143 March 2019
*Impact Factor (SJIF) - 6.261* | *Special Issue 160 :* भारतातील सामाजिक व सांस्कृतिक समस्या

# भारतातील शेतकरी आत्महत्या व त्यांच्या कुटुंबावरील प्रभाव

डॉ.आर.व्ही. मोरे
स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड, जि. वाशिम

**प्रस्तावना :**

भारत देश हा खेड्यांचा देश आहे, असे म्हटले जाते. २०१६ मध्ये देशातील एकुण लोकसंख्येपैकी ६६.८४ % लोकसंख्या ही ग्रामिण भागात राहत होती. तर शहरी भागातील लोकसंख्या ३३.१४ % इतकी होती. आज आपल्या देशातील खेड्यांची एकुण संख्या ६ लाख ४९ हजार ४८१ इतकी आहे. अलीकडच्या काळात ग्रामिण भाग दळणवळणाच्या माध्यमातुन शहरांशी जोडल्या गेला असला तरी अजुनही ग्रामिण भागाचा विकास झाला नाही. ग्रामिण समुदायातील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. परंतु शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. शेतीचा विकास झाला नाही. शेतकऱ्यांची विशेषत: गरीब शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. ते आपल्या कुटुंबियांचे योग्य पालपोषण करु शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना आत्मंहत्या करावी लागते. आधुनिक काळात भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्येची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे.

**भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे स्वरुप :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. खेदाची बाब आहे की, कृषीप्रधान देशातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. १९९७ ते २००५ या कालावधीमध्ये देशात दर दिवशी ३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. म्हणजे दर ३२ मिनीटाला १ शेतकरी आत्महत्या करीत होता. २०१२ पासुन हे प्रमाण दर ३० मिनिटावर आले. भारताच्या राष्ट्रीय गुन्हा नोंदणी ब्युरोच्या २०१२ च्या वार्षिक अहवालानूसार २०१२ मध्ये देशातील एकुण १ लाख ३५ हजार ४४५ लोकांनी आत्महत्या केली. त्यापैकी १३ हजार ७५५ हे शेतकरी होते. आत्महत्या करणाऱ्या एकुण लोकांपैकी शेतकरी आत्महत्येचे प्रमाण हे ११.०२ % इतके आहे. यावरुन शेतकरी आत्महत्येची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येते.

**भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या :: (२००१ ते २०११)**

| वर्ष | महाराष्ट्र | आंध्रपदेश | कर्नाटक | मध्यप्रदेश आणि छत्तिसगढ | वार्षिक एकुण | भारत एकुण आत्महत्या |
|---|---|---|---|---|---|---|
| २००१ | ३५३६ | १५०९ | २५०५ | २८२४ | १०३७४ | १५४१५ |
| २००२ | ३६९५ | १८९६ | २३४० | २५७८ | १०५०९ | १७९७१ |
| २००३ | ३८३६ | १८०० | २६७८ | २५११ | १०८२५ | १७१६४ |
| २००४ | ४१४७ | २६६६ | १९६३ | ३०३३ | ११८०९ | १८२४१ |
| २००५ | ३९२६ | २४९० | १८८३ | २६६० | १०९५९ | १७१३७ |
| २००६ | ४४५३ | २६०७ | १७२० | २८५८ | ११६३८ | १७०६० |
| २००७ | ४२३८ | १७९७ | २१३५ | २८५६ | ११०२६ | १६६३२ |
| २००८ | ३८०२ | २१०५ | १७३७ | ३१५२ | १०७९६ | १६१९६ |
| २००९ | २८७२ | २४१४ | २२८२ | ३१९७ | १०७६५ | १७३६८ |
| २०१० | ३१४१ | २५२५ | २५८५ | २३६३ | १०६१४ | १५९६४ |
| २०११ | ३३३७ | २२०६ | २१०० | १३२६ | ८९६९ | १४०२७ |
| एकुण | ४०९८३ | २४०१५ | २३९२८ | २९३५८ | ११८२८४ | १८३१६९ |

वरील तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की, २००१ त २०११ पर्यंत एकुण ११८२८४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. तसेच भारतात सर्वात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या या महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कनाटक, मध्यप्रदेश आणि छत्तिसगढ या राज्यात झाल्या आहेत.

२०१३ मध्ये एकुण १ लाख ३४ हजार ७९९ लोकांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी ११ हजार ७७२ आत्महत्या या शेतकऱ्यांच्या होत्या. २०१४ मध्ये १ लाख ३१ हजार ६६६ लोकांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी १२ हजार ३६० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. २०१५ मध्ये १ लाख ३३ हजार ६२३ लोकांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी १२ हजार ६०२ आत्महत्या या शेतकऱ्यांच्या होत्या. आतापर्यंत सर्वांत जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या २००४ या वर्षात झाल्यात. त्यावर्षी एकुण १८ हजार २४१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत महत्वाची बाब म्हणजे शेतकरी असलेल्या स्त्रियांनी देखील आत्महत्या केल्या.

२०१७ मध्ये महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा, तमिळनाडू, कर्नाटक, मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश, ओरिसा आणि झारखंड या राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आत्महत्या केल्या. आपल्या महाराष्ट्रात शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. कर्जबाजारीपणा, नापिकी, शेतकऱ्यांना योग्य भाव न मिळणे इ. कारणांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखिची झाली आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या महसुल, मदत व पुनर्वसन विभागाच्या नोंदीनुसार २०११ ते २०१५ या कालावधीत २० हजार ८७३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात.

२०१५ मध्ये महाराष्ट्रात एकुण ३ हजार २२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. महाराष्ट्रातील महसुल विभागानुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी पूढीलप्रमाणे आहे. अमरावती-११७९, औरंबागाद-११३०, नागपूर-३६२, नाशिक-४५९, पूणे-९६ आणि कोकण-२, विदर्भात अमरावती आणि नागपूर हे दोन विभाग मिळुन १५४१ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. २०१६ मध्ये महाराष्ट्रात ३०५२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. १९९५ते २०१३ या कालावधीत महाराष्ट्रातील एकुण ६० हजार ७५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, असे राष्ट्रीय गुन्हा नोंदणी ब्यूरोच्या अहवालात नमूद केले आहे.

१ जानेवारी २०१७ ते ३१ ऑक्टोंबर २०१७ पर्यंत महाराष्ट्रातील एकुण २ हजार ४१८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. तर जानेवारी २०१८ ते मार्च २०१८ या तीन महिन्याच्या कालावधीत महाराष्ट्रात

६९६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. तर विदर्भात सर्वात जास्त म्हणजे ३२९ शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडून आल्यात.

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या

| वर्ष | शेतकऱ्यांच्या आत्महत्या |
|---|---|
| २००१ | ३७८ |
| २००२ | ३९२ |
| २००३ | ३९६ |
| २००४ | ४९४ |
| २००५ | ४६८ |
| २००६ | ४८६ |
| २००७ | १००१ |
| २०१५ | १५४१ |
| २०१८ (जानेवारी ते मार्च) | ३२९ |

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा त्यांच्या कुटुंबावरील प्रभाव :** शेतकऱ्यांनी आर्थिक परिस्थिती, कौटुंबिक ताण-तणाव इ. बाबींना कंटाळुन आत्महत्या केली तरी त्यांच्या कुटुंबातील समस्या सुटत नाही. आत्महत्या करुन शेतकरी समस्यांपासुन मुक्त होते, परंतु आपल्या कुटुंबाला निराधार करतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येमुळे त्यांच्या कुटुंबाच्या समस्या कमी न होता वाढतात.

१) **कुटुंबाची अस्वस्थता :** आत्महत्या करणारे शेतकरी हे बहुतांश कुटुंबांचे प्रमुख आणि कुटुंबाचे पालनपोषणकर्ते असल्याचे आढळुन येतात. कुटुंबाचे पालनपोषण करणारा आधारच गेल्यामुळे कुटुंबाच्या सदस्यांपूढे उदरनिर्वाह कसा करायचा ? असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे पिडीत कुटुंबाला अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. पिडीत कुटुंबातील मुला-मुलींना शाळा किंवा इतर शिक्षण सोडून शेतीवर किंवा दुसरीकडे मजुरी करावी लागते. कुटुंबातील वृध्द आई-वडीलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पिडीत कुटुंबातील मुला-मुलींचे लग्न जुळत नाहीत. त्यामध्ये अनेक अडथळे निर्माण होतात.

२) **कुटुंबातील सदस्यांवर मानसिक परिणाम :** शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा फार मोठा मानसिक परिणाम पिडीत कुटुंबातील सदस्यावर पडतो. सर्व सदस्य दु:खी होतात. आता आपण कसे जगणार? असे प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण होतात. ते दु:ख आणि नैराश्येने घेरले जातात. आपला मुलगा, पती गेल्यामुळे कुटुंबातील आई-वडील आणि त्याची पत्नी दु:खी होते. मुलाचे वडील गेल्यामुळे मुलांना एकाकी वाटते. काही सदस्य मानसिक आघात सहन न झाल्यामुळे आजारी पडतात.

३) **कुटुंबावर आर्थिक परिणाम :** पिडीत कुटुंबातील कर्ता व्यक्ती गेल्यामुळे त्याचा परिणाम शेतीच्या उत्पन्नावर होतो. पिडीत कुटुंबाला आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे कर्ज फेडावे लागते. त्याकरीता त्यांना इतर संपत्ती, गुरे-ढोरे आणि शेतजमिन सुध्दा विकावी लागते. कुटुंबाचे उत्पन्न घटणे, कामात रस नसणे, आर्थिक नुकसान, मृत शेतकऱ्यांचे कर्ज फेडुन कुटुंबाचे पालनपोषण करण्याबाबत अनेक आर्थिक समस्या पिडीत कुटुंबापुढे निर्माण होतात. त्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागतो.

४) **नुकसान भरपाई मिळाल्यामुळे :** शेतकऱ्यांच्या आत्महत्येमुळे त्यांच्या पिडीत कुटुंबाला मदत म्हणुन शासनाकडून नुकसान भरपाई दिली जाते. पिडीत कुटुंबाला नुकसान भरपाई मिळाल्यामुळे अनेक कुटुंबात संघर्ष निर्माण झाल्याचे आढळते. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पत्नीला नुकसान भरपाईची रक्कम दिली जाते. ही नुकसान भरपाई कुटुंबातील सर्व सदस्यांसाठी असते कारण कुटुंबाचा कर्ता पुरुष गेल्यामुळे सदस्यांच्या उपजिवीकेचा प्रश्न निर्माण होतो.

अशाप्रकारे शेतकरी आत्महत्या करुन आपले जीवन संपवितो. परंतु तो आत्महत्या करुन आपल्या कुटुंबाला संकटात लोटत असतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा त्याच्या कुटुंबावर विपरीत परिणाम होतो.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याचे उपाय :** शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही केवळ वैयक्तिक समस्या नाही. तर ती फार मोठी सामाजिक समस्या आहे. या समस्येचा शेतकऱ्यांच्या कुटुंबावर आणि देशावर देखील विपरीत परिणाम होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी पूढील प्रकारच्या उपाययोजना सांगता येतील.

१) शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव देणे.
२) सिंचनाच्या सोयी उपलब्ध करुन देणे.
३) शेतकऱ्यांसाठी कमी व्याजदराची कर्जाची व्यवस्था करणे.
४) शेतीसाठी पुरेसा विद्युत पुरवठा उपलब्ध करुन देणे.
५) शेती पिकांकरीता पिक विम्याची सोय करणे.
६) मद्यपान आणि जुगार यावर बंदी घालणे.
७) शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञानाची माहीती देणे.
८) नैसर्गिक आपत्ती मुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरीत शासकीय मदत पूरविणे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. बोरसे शिवनाथ : शेतकऱ्यांच्या समस्या शोध आणि बोध, वसुधा प्रकाशन, नासिक-२००५
२. आगलावे डॉ.प्रदीप व : भारतातील सामाजिक समस्या, श्री साईनाथ आगलावे डॉ.सरोज प्रकाशन, नागपूर, जुलै-२०१८
३. नरेंद्र लांजेवार : शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंतन आणि उपाय, सुमेरू प्रकाशन डी-राजहंस सोसायटी, डोंबीवली
४. बोकरे दिवाकर : शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या कशा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
५. लोकराज्य : फेब्रुवारी-२०१९



IQAC
Co-ordinator
Late Pushpadevi Patil Arts & Science
Risod Dist. Washim-444506
Principal
Late Pushpadevi Patil Arts & Science
College Risod Dist-Washim